# "विज्ञानवादी जनप्रबोधनकार संत गाडगे बाबा"-- चिकित्सक अभ्यास

**स.प्रा. डॉ. संदीप वि. घोडके**

**नवी मुंबई**

**प्रस्तावना** ---

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. अनेक संत होऊन गेले. त्यांच्या पैकी एक संत गाडगे बाबा. बाबांचे वेगळे पण म्हणजे पूर्ण अशिक्षित असूनही वास्तववाद व वैज्ञानिक दृष्टिकोन याचा स्विकार व प्रचार केला. संपूर्ण हयात साधेपणा ने जीवन जगत समाज , रंजले गांजलेल्या करिता आधार दिला. मिळालेल्या देणग्या व साहित्य सर्व जणकल्याणा साठी दिले. स्वतः साठी कांही ही राखून ठेवले नाही.

**जीवन परिचय--**

गाडगे महाराज (जन्म: २३ फेब्रुवारी १८७६; मृत्यू: २० डिसेंबर १९५६) हे गाडगे बाबा म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी स्वेच्छेने अत्यंत साधी रहाणी स्वीकारली होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रुची होती. विसाव्या शतकातील समाजसुधार आंदोलनांमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्त्वाचे नाव गाडगे बाबा यांचे आहे.

संत गाडगे महाराजांच पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांच्या वडिलांचे नाव - झिंगराजी राणोजी जाणोरकर तर आईचे नाव - सखुबाई झिंगराजी जणोरकर हे होते. गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले प्रसिद्ध समाजसुधारक होते. दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपलं संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे गाडगेबाबा हे संता मधील सुधारक आणि सुधारकां मधील संत होते. ते लहान असतानाच त्यांचे वडील वारले. मामाच्या आश्रयात असताना १.०२.१९०५ रोजी पहाटे ग्रहत्याग केला. अंगावर गोधडी म्हणून गोधडे महाराज, हातात गाडगे म्हणून गाडगे बाबा व हातात झाडू घेऊन महाराष्ट्र, आंध्रप्रदेश कन्नड भागात खूप भटकंती केली. स्वच्छता प्रसारासाठी सतत झाडूचा वापर,व अंधश्रधा दूर करण्यासाठी विविध प्रकारचे उदाहरण देऊन किर्तन करित.

**प्रबोधनाची प्रभावी पध्दत –**

लहान पणापासून बाबांना किर्तनाची आवड होती. कीर्तन म्हणजे लोक प्रबोधनाचा एक भाग असे. आपल्या कीर्तनातून समाजातील दांभिकपणा रूढी परंपरा यावर ते टीका करत. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना

स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण गाडगेबाबा देत. गाडगेबाबा म्हणजे एक चालती-बोलती पाठशाळा होती.

गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी |" असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका." अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

**विज्ञाननिष्ठ संत –**

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा(प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. 'देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत,कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे .' असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. संत व सुधारक या दोन्हीही वृत्ती गाडगेमहाराजांत होत्या. तुकारामांप्रमाणे ठणकावून् सत्य सांगण्याचे धैर्य बाबांमध्ये होते.

जनसंपर्क होता. समाजाचा अर्धा भाग जो स्त्रिया व अतिशूद्र या सर्वांना व सुशिक्षित समाजथरातील जे येतील अशा स्त्रीपुरुषांना एकत्र बसवून, म्हणजे भेदाभेद, स्पृश्यास्पृश्यता संपूर्ण बाजूस घालवून हरिभक्तीचा रस चाखण्यास सर्व वर्गातील, सर्व थरातील बायाबापडी, श्रीमंत व गरीब वगैरे सर्व एकत्र होत.

**संत गाडगेबाबा व भाऊराव --**

संत गाडगेबाबा रेल्वेने जाताना पाडळी स्टेशन(सातारा)उतरत.भाऊराव कारखाना उभारणीसाठी तेथे काही काळ कुटुंब सोबत राहिले होते.भुउरावांची पत्नी लक्ष्मीबाई यांच्या कडून गाडगेबाबा भजी मागत ते लांब एका झाडा खाली जाऊन खत आसत.ते येता पाडळी स्टेशनवर उतरत व लक्ष्मीबाई यांची हातची भजी भाकरी नक्की खात याचे गूढ कोणालाही समजत नसे.,

पुढे भाऊराव व गाडगेबाबा यांचा परिचय झाला व पुढे तो वाढीस लागला.पंढरपूर क्षेत्री जातीजमातीच्या यात्रेकरूची येण्या-उतरण्याची सोय होऊ लागली.परंतु अस्पृश्य लोकांची काहीएक सोय होत नसे हे लक्षात घेत बाबांनी अस्पृश्य लोकांना धर्मशाळा बांधली व त्याला संत चोखा धर्मशाळा नाव दिले.या धर्मशालेचे विश्वस्त म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांची नेमणूक केली.व फलटणचे धार्मिकवृत्तीचे राजे श्रीमंत मालोजीराव नाईक निंबाळकर यांची निवड केली.पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यामुळे ही धर्मशाळा त्यांच्या स्वाधिंण केली.यावेळी बाबांनी मुद्दाम कर्मवीर भाऊराव पाटील यांना बोलावले होते.या वेळी या तीन महामानवाणचा एकत्रित फोटो सर्व प्रसिद्ध आहे.

श्री. जी. डी. साळुंखे व त्यांचे इतर कार्यकर्ते यांनी महाराष्ट्र भर फिरूनअपेक्षित रक्कम जमा केली ही लाखाची थैली देण्यासाठी भारताचे राष्ट्पती डॉ. बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते देण्याचे ठरवू होते ते उपलब्ध न झाल्याने ती थैली बाबांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांना देण्याचा अनोखा उपक्रम झाला. म्हणजे राष्ट्रपती समक्ष गाडगे बाबा यांना समाज मान्यता आहे. असे जाणवते.

**कार्यामुळे बाबांना संतत्व --**

त्याचं संतत्व इतरांप्रमाणे केवळ धार्मिक क्षेत्रापुरतं मर्यादित राहत नाही. ते मानवी जीवनाच्या दाही दिशांना स्पर्शून त्याला उजळून काढते. म्हणूनच कुणाला ते संत वाटतात, तर कुणाला महान समाजसुधारक वाटतात. इतर संतांनीही समाजसुधारणा केली आहेच. परंतु, शब्द आणि वाणी याशिवाय दुसरी साधणं त्यांनी क्वचितच वापरली असतील. डेबूजीच्या हातातील 'फुटकं गाडगं' आणि 'खराटा' ही जगावेगळी साधनं होती. त्या प्रतिकांच्या मागे महान आशय दडलेला होता. आर्थिक, धार्मिक आणि सामाजिक जीवनातील समतेचा ध्वनी

त्यातून आसमंतात निनादतांना ऐकू येतो आणि एका कृतिशील कर्मयोगी जीवनाची त्यातून जुगलबंदी होते. यातून निर्माण होणारे संगीत मोठं प्रभावी आणि प्रेरणादायी ठरते. कुंभकर्णी झोपेत बुडालेल्या अजगरागत सुस्तावलेल्या समाजाला ते जागे करते.

**अज्ञान व अंधश्रद्धेत गुरफटलेला समाज --**

मराठी समाज, त्यातही वैदर्भीय समाज हा रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धाच्या चिखलात रुतून पडलेला, मतकळा आलेला चैतन्यहीन समाज. त्यातच अज्ञानामुळे त्याची गती अवरुद्ध झालेला. नाना सवयी आणि व्यसनांमुळे मंदावलेला विक्षिप्त संकेतांच्या काळोख्या वाटांत पसरलेले हे समाजजीवन, राख फासून, जटा वाढवून, कपनी घालून कुण्या वैराग्याने यावे आणि त्याचे देवदूत म्हणून आगतस्वागत आम्ही करावे. साधू आणि भोंदू यातील सीमारेषाच पार पुसून जावी. हिवतापाने लेकरू तडफडले तर शास्त्रीय इलाजाचा अवलंब न करता आम्ही मरीमायचा कोप समजून कोंबडे-बकरे कापावे, संसाराचा एकमेव आधार असलेली शेतीवाडी विकून कर्ज काढून थाटामाटात लग्नप्रसंग उरकावे, चारीधाम आणि काशीपंढरी करून कृतकृत्य व्हावे. यामुळे वैभवाच्या प्रचंड गुढ्या झपाट्यानं खचत जाऊन पडलेल्या भगदाडात अठराविश्वे दारिद्र्य ठाण मांडून बसावं, या अतिगतिमान दुष्टचक्रात आमचं लोकजीवन पुरतं भरडून निघावं. विषारी कृमीकिटकांनी आतून पोखरून काढल्यामुळे उन्मळून पडणाऱ्या वटवृक्षात हे जीवन जीर्णशीर्ण होऊन जावं.

परंतु, ज्या भूमीत पाळंमुळं खोलवर रुजलेली आहेत, ती भारतभूमी ही देवभूमी आहे. ॲनी बेझंटसारखी विदुषी येथील माती कपाळाला लावते त्याला काही अर्थ असतो. ही कबीर तुलसीची जन्मभूमी, ज्ञानेश्वर-तुकारामांची कर्मभूमी आहे. समाज असा गर्तेत कोसळू लागतो तेव्हा संत महंत त्याला सावरून धरतात. अंधकारातून मुक्तप्रकाशाकडे नेणारे तेजोवलय ते आपल्या डोक्यात घेऊन येतात. ज्ञानोबानंतर त्याचे दर्शन महाराष्ट्राला गाडगे महाराजांच्या तेजोगर्भ डोळ्यातच झाले असेल. येथील मरगळलेल्या जीवनात नवचैतन्य ओतण्याचे त्याचे आत्मतेज दीप्त करण्याचे सामर्थ्य यात होते. त्यानेच येथील माणसाला अंधकारातून बाहेर पडण्याची वाट दाखविली.

**अंधश्रद्धेला प्रखर विरोध --**

येथील ग्रामीण जीवन, अज्ञान, अंधश्रद्धा, देवधर्म, भोळेपणा यात पुरतं भरकटलेलं होतं. जातीपातीच्या जंगलात माणुसकीचा मार्ग विसरलेला होता. गुरं राखण्याचे काम करीत असल्यापासून डेबुजीने हा प्रश्न धसास लावला. सगळ्या संवंगड्याच्या शिदोऱ्या एकत्र करून मग सगळ्यांची न्याहारी होई. एकदा सोबत्यानं जात बाटण्याची भीती बोलून दाखविली तेव्हा त्याला डेबूजीनं या शद्बांत सांगितलं… 'अरे,

आपल्याले दाने डोये, त्याले दोन डोये, आपल्याले एक तोंड, एक नाक तसंच त्याले. आपण मानूस, तसाच तोही मानुसच...' आणि पुढे तर हातात खराटा घेऊन गावातील आणि जनामनातील हा कचरा साफ करण्याचं अखंड व्रतच त्यांनी चालवलं. गावातील गलिच्छ वस्त्या स्वच्छ केल्या. ग्रामसफाई झाल्यानंतर मग ते पाटील-देशमुख, ब्राह्मण-महार याचा विचार न करता कोणत्याही दारापुढे उभे राहून भीक मागत. फुकट त्यांनी कधी खाल्लं नाही. सोबती आणि शिष्यांनाही खाऊ दिलं नाही. श्रम, प्रतिष्ठा आणि माणुसकी या दोन गोष्टी त्यांच्या खराटा यज्ञानं साधल्या.

**लोकउपयोगी कार्ये --**

लक्षावधी रुपये वर्गणी रूपाने जमवून त्यांनी धर्मशाळा, गौशाला व पाठशाला, पाणपोया, घाट, पाणवठे बांधून लोकहिताची कामे केली. त्यांची ही कर्तबगारी पाहिली की गाडगेबाबा ही एक व्यक्ती नव्हती, तर विशाल जनसमुदायाशी एकरूप झालेला तो चेतन विचारप्रवाह होता, असे वाटते. ते राहीले, वावरले, जगले, वारले तेही लोकांत-जनसमुदायात. त्यांच्यासाठी त्यांनी मोठमोठ्या संस्था काढल्या, पण हयातीत त्या संस्थांची 'संस्थाने' होऊ दिली नाहीत. सेवाकार्यापासून ते कधीच ढळले नाहीत. यात्रा मेळ्यात गेले ते जनता जनार्दनाच्या सेवेसाठी, आंधळ्या, पांगळ्या, रंजल्या, गांजल्याची सेवा हीच त्यांनी विठ्ठलाची भक्ती मानली. त्यांना अन्न-वस्त्राचं दान दिलं. पण, धट्ट्याकट्ट्याला कधी फुकाचं खाऊ घातलं नाही. यासाठी लक्षावधी रुपये जमवून खर्च केले. त्यातील पै-पैशाचाही विनियोग स्वत:साठी कधी केला नाही.

**वैज्ञानिक दृष्टीकोन --**

अंधश्रद्धा आणि कर्मकांडांचं पोषण करण्याच्या पोथ्या, रितीरिवाज यांची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. आजही अध्यात्मात बुवाबाजीचे प्रस्थ आहे. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. तोच आमच्या जीविताला सुवर्णमूल्य प्राप्त करून देईल, असे वाटते.

धर्म, समाज आणि अर्थकारणाची त्रिवेणी गाडगे महाराजांच्या जीवनात आणि विचारात झालेली आहे. त्यांच्यात ज्ञानेश्वर आहे, जोतिबा फुले आहेत आणि कार्लमाक्सही आहे. एकाशिवाय दुसरा पांगळा आहे आणि म्हणूनच गाडगे महाराज हा स्वयंसिद्ध असा पूर्ण पुरुष आहे. आज मतामतांच्या गलबल्यात हरविलेल्या समाजपुरुषाला त्याचे पुरोगामी संतत्व पूर्णत्वास नेण्यास समर्थ आहे.

वैराग्यमूर्ती गाडगेबाबांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या मातीत अखेरचा श्वास घेतला. विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचे लवकर जाणे बाबांनी मनाला लाऊन घेतले. मुलांच्या

निधन वार्ता समजून ही त्यांनी चालू किर्तन सोडले नाही. पण आंबेडकर यांच्या आकस्मिक जाण्याच्या धक्याने बाबा जग सोडून गेले. त्याचे शेवटचे किर्तन वांद्रे येथील माझ्या आजीने ऐकले आहे.

खराट्याचा, श्रम प्रतिष्ठेचा मंत्र जगाला दिला, शिक्षणाचे महत्त्व सांगितले, व्यसनमुक्तीचे आंदोलन उभारले, अपप्रवृत्तीबद्दल बंड पुकारले, कीर्तनातून समाज परिवर्तन केले, रयत शिक्षण संस्थेला अर्थसहाय पुरविले. मात्र तरीही या संताची उपेक्षाच झाली. गाडगेबाबांना न्याय मिळाला नाही, बाबा उपेक्षितच राहिले.

**संदर्भ -**

१) मा.भि. काटकर --- प्रबोधनाची धगधगती मशाल

२) प्राचार्य रा.तु.भगत --- गाडगे बाबांची काठी

३) लेखकास ज्ञात व पूर्वजांच्या कडील माहिती.